श्री.बी.जे.देशमुख, सेवानिवृत्त सहनिबंधक, सहकारी संस्था यांची करार पध्दतीने सहनिबंधक संवर्गात नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृबास-०८१९/प्र.क्र.१३७/२१-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ३१ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> :-

१. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. पणन-५/कृऊबास/पुणे/सचिव नियुक्ती १९/३१२५, दि. १४.०८.२०१९
२. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६
३. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.२१.०२.२०१८

प्रस्तावना :-

पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिव पदावर श्री.बी.जे.देशमुख, सहनिबंधक, सहकारी संस्था हे कार्यरत आहेत. श्री.बी.जे.देशमुख नियत वयोमानानुसार दि. ३१.०८.२०१९ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीचे सचिवपद दि. ०१.०९.२०१९ पासून रिक्त होत आहे. श्री.बी.जे. देशमुख यांनी पुणे बाजार समितीमध्ये सचिव पदावर केलेले उल्लेखनीय काम, विविध बाजार घटकांनी त्यांच्या नेमणूकीसाठी केलेली मागणी, बाजार समितीचे पोट नियमातील तरतूद, बाजार समितीचा ठराव, बाजार समितीमध्ये सुरु / प्रस्तावित असेलेली अत्यंत आवश्यक विकास कामे तातडीने पुर्ण करण्याची आवश्यकता, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मार्च २०२० पर्यंत निवडणूक प्रक्रिया पुर्ण करण्याचे दिलेले निर्देश व त्यानुषंगिक सुरु असलेली कार्यवाही, सहकार विभागाचे अभिप्राय, शासन निर्णय १७.१२.२०१६ व २१.०२.२०१८ च्या तरतूदी विचारात घेऊन श्री बी.जे.देशमुख सेवानिवृत्त सहनिबंधक यांची करार पध्दतीने एक वर्षाकरिता सहनिबंधक संवर्गात नियुक्ती करुन त्यांची पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिव पदावर पदस्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

श्री.बी.जे. देशमुख, सहनिबंधक, सहकारी संस्था यांनी पुणे बाजार समितीमध्ये सचिव पदावर केलेले उल्लेखनीय काम, विविध बाजार घटकांनी त्यांच्या नेमणूकीसाठी केलेली मागणी, बाजार समितीचे पोट नियमातील तरतूद, बाजार समितीचा ठराव, बाजार समितीमध्ये सुरु / प्रस्तावित असेलेली अत्यंत आवश्यक विकास कामे तातडीने पुर्ण करण्याची आवश्यकता, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मार्च २०२० पर्यंत निवडणूक प्रक्रिया पुर्ण करण्याचे दिलेले निर्देश व त्यानुषंगिक सुरु असलेली कार्यवाही व सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७.१२.२०१६ व दि. २१.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेऊन श्री. बी.जे.देशमुख, सेवानिवृत्त सहनिबंधक, सहकारी संस्था यांची करार पध्दतीने दि. ०१.०९.२०१९ पासून एक वर्षाकरिता सहनिबंधक, सहकारी संस्था ह्या संवर्गात नियुक्ती करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यांची पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिव पदावर खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून पदस्थापना देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी श्री.बी.जे.देशमुख, सेवानिवृत्त सहनिबंधक, सहकारी संस्था यांची राहील या आशयाचे बंधपत्र/ हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात यावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

२) श्री.बी.जे.देशमुख यांची नियुक्ती ही नियमित स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिव पदावरील विवक्षित कामासाठीच करण्यात यावी.

३) करार पध्दतीने नियुक्तीमुळे शासन सेवेत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पदोन्नतीच्या संधीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

४) श्री.बी.जे.देशमुख सेवानिवृत्त सहनिबंधक यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणित करुन त्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीने निश्चित करण्यात यावे.

५) उक्त तरतूदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या “जास्तीत जास्त २५%” इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम “निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दुरध्वनी भत्ता” या सर्व भत्त्यांपोटी

प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम श्री.बी.जे.देशमुख, सेवानिवृत्त सहनिबंधक यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात यावी.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या श्री. बी.जे.देशमुख यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

७) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे अनुज्ञेय होणाऱ्या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

८) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या श्री. बी.जे.देशमुख यांना अनुज्ञेय होणाऱ्या पारिश्रमिकापोटी व भत्यांपोटी होणारा खर्च पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

९) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे श्री. बी.जे. देशमुख यांना शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

१०) विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी श्री. बी.जे.देशमुख, सेवानिवृत्त सहनिबंधक यांची करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार शासनास राहतील.

११) श्री.बी.जे.देशमुख, सेवानिवृत्त सहनिबंधक हे सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेले नाहीत याची खात्री करण्यात यावी व तसे लेखी हमीपत्र घेण्यात यावे.

१२) श्री.बी.जे.देशमुख, सेवानिवृत्त सहनिबंधक यांनी गुंतलेले हितसंबंध जाहीर करणे आवश्यक राहील.

१३) श्री.बी.जे.देशमुख, सेवानिवृत्त सहनिबंधक त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१४) श्री.बी.जे.देशमुख, सेवानिवृत्त सहनिबंधक त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८३११२४८०५८६०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jayant Baliram Bhoir

Digitally signed by Jayant Baliram Bhoir
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Cooperation, Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=33a892413bd2c105002f2acc67792c5931afb42987d31b0deb6c0181d19c74aa, serialNumber=33432a8e2e81dcab0518d2a6ca4f4f1d3dba7ca3247657527f52bef2a2aa29b2, cn=Jayant Baliram Bhoir
Date: 2019.08.31 12:54:27 +05'30'

(जयंत भोईर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (सहकार) मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री (पणन), मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (पणन) मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (सहकार) मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव(सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
८. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
१०. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण
११. प्रशासक/सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे
१२. श्री.बी.जे.देशमुख, सेवानिवृत्त सहनिबंधक
१३. निवडनस्ती (२१-स).